# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक. :
२५६०१२६४
२५६०१२६५

गणेशखिंड, पुणे ४११००७
नियोजन व विकास विभाग

**संदर्भ क्र.:पुवि/निववि/** **दिनांक : ०५/०७/२०११**

प्रति,

१. मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये.
२. मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था.

विषय:— पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शा.नि.क्र.निर्मल—१००९/प्र.क्र. १९१/पापु १६, दिनांक २९ ऑगस्ट, २००९.

महोदय/महोदया,

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग पत्रक क्र. सकीर्ण—२०११/(१०३/११)/मशि—३, दिनांक १८ एप्रिल, २०११ च्या परिपत्रकानुसार सर्व महाविद्यालयांनी शासनाच्या निर्मल शाळा व महाविद्यालय या योजनेत सक्रिय सहभाग घ्यावा. सोबत आपल्या माहिती व कार्यवाहीसाठी शासनाचे वरील विषयासंदर्भातील प्रपत्र व स्वच्छता विषयक सुविधाची माहिती भरण्याचा नमुना जोडला आहे.

तरी सर्व महाविद्यालयानी याबाबत त्वरित नोंद घ्यावी. ही विनंती.

आपला विश्वासू

उपकुलसचिव
नियोजन व विकास

Inward No.: 2373
Date : 28/06/2011
BCUD
University of Pune

मा. कुलसचिव कार्यालय
पुणे विद्यापीठ, पुणे-७.
आवक क्र.-आर/ 2923
दिनांक - 27/06/11
जावक दिनांक- 28/06/11
विभाग- D/BCUD

UNIVERSITY OF PUNE (General Section) 23 JUN 2011 Inward No.

UNIVERSITY OF PUNE (General Section) 23 JUN 2011 Inward No.: 453

**महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून स्वच्छताविषयक माहितीचे संकलन करणेबाबत...**

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
परिपत्रक क्र.संकीर्ण -२०११/(१०३/११)/मशि-३,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक :- १८ एप्रिल, २०११.

**पहा :-** पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शा.नि.क्र.निर्मल-१००९/प्र.क्र.१९९/पापु १६, दिनांक २९ ऑगस्ट,२००९,

DEVELOPMENT SECTION
INWARD NO. 1167
DATE 1/7/2011

**परिपत्रक :-**

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानामुळे स्वच्छतेसाठी जे पोषक वातावरण तयार झाले आहे, त्यामुळे महाराष्ट्राने निर्मल ग्राम योजनेत आघाडी घेतली असून निर्मल ग्राम पुरस्कार मिळविणा-या देशातील एकूण ग्रामपंचायतींपैकी सर्वाधिक ग्रामपंचायती महाराष्ट्रातील आहेत. या पुरस्कार योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेऊन ग्रामस्थांचे आरोग्य उंचवावे व पुरस्काररुपाने जास्तीत जास्त निधी राज्यातील ग्रामीण विकासासाठी उपलब्ध करून घेण्याच्या दृष्टीने राज्याचा ग्रामीण भाग हागंदारीमुक्त करण्याचा राज्यशासनाचा निर्धार आहे. शौचालयाच्या स्वयंस्फूर्त बांधकामास व त्याच्या योग्य वापरास अधिक चालना देण्याच्या दृष्टीकोनातून दि.२३ जुन २००३ रोजी, केंद्र शासनाने स्वच्छ व पूर्णपणे हागंदारीमुक्त होणाऱ्या ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषदांसाठी "निर्मल ग्राम पुरस्कार योजना" जाहीर केली.

लहान मुले व युवक हे देशाचे भावी नागरिक असुन लहानपणीच त्यांच्यावर चांगले संस्कार झाले तर त्यातुन भविष्यात चांगले नागरिक व पालक तयार होतील. महाविद्यालयात शुध्द पिण्याच्या पाण्याची सोय असणे, स्वच्छतेच्या सोयी असणे, स्वच्छ व आनंददायी वातावरणात शिक्षण मिळणे हे त्यांचे हक्क असून आपल्या सवंगड्यात, कुटुबांत रमणे ही त्यांची भावनिक गरज आहे. त्यासाठी घरात तसेच महाविद्यालयात स्वच्छतेच्या सवयी अंगवळणी पडणे आवश्यक आहे.

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानात महाविद्यालयांचा सहभाग व्यापक प्रमाणात मिळविण्यासाठी प्रत्येक महाविद्यालयात संदर्भीय शासन निर्णयानुसार विहीत केलेल्या स्वच्छतेच्या सुविधा असणे तसेच त्यात शिकणा-या प्रत्येक विद्यार्थ्यांच्या कुटुंबाकडे वैयक्तिक शौचालय असणे व त्याचा नियमीत वापर करणे, या सर्व बाबी महाविद्यालयात असल्यास त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी राज्यातील महाविद्यालयांना निर्मल महाविद्यालय म्हणून पुरस्कार देण्यात येतो. या उपक्रमामागील प्रमुख उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांनी स्वच्छतादूत म्हणून समोर येऊन त्यांनी त्यांच्या कुटुंबीयांना, शेजाऱ्यांना व मित्रांना शौचालय बांधुन त्याचा नियमित वापर करण्यासाठी प्रवृत्त करावे असा आहे.

राज्यातील महाविद्यालये / संस्थांमध्ये दरवर्षी हजारो विद्यार्थी प्रवेश घेत असतात. त्यांना प्रवेशा सोबतच स्वच्छतेचा संदेश देणारे पत्र देऊन त्या विद्यार्थ्यांकडे शौचालयाची उपलब्धता व स्वच्छतेच्या सवयींची माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये संकलीत करुन घेतल्यास त्या विद्यार्थ्यांवर स्वच्छतेचे संस्कार करता येतील. म्हणून,



Shri Pakhede put it on web.
संचालक, मंविविमं.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील सर्व महाविद्यालयांनी शासनाच्या निर्मल शाळा व महाविद्यालय या योजनेत सक्रिय सहभाग घ्यावा. सदर प्रपत्रास महाविद्यालयाच्या प्रवेश पत्राचा एक अनिवार्य भाग करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जासोबतच हे प्रपत्र भरुन महाविद्यालयास देणे बंधनकारक असेल. महत्त्वाचे म्हणजे संदर्भीत शासन निर्णयातील अटींची पुर्तता केल्यास व सर्व विद्यार्थ्यांनी त्यांच्या कुटुंबीयाना शौचालय बांधण्यासाठी प्रवृत्त केल्यास संबंधित महाविद्यालयास निर्मल महाविद्यालयाचा दर्जा प्राप्त होऊ शकतो. यातूनच उद्याच्या स्वच्छ, सुंदर,निरोगी, सृदढ व बलवान महाराष्ट्राची निर्मिती होण्यास मदत होईल.

या आदेशांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सर्व संबंधित संचालक व विद्यापीठे यांची असून त्यांनी आपल्या नियंत्रणाखालील सर्व संबंधीतांना वरील आदेशांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना द्याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( महेश पाठक )**
**सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

सर्व संचालक. (उच्च शिक्षण / तंत्र शिक्षण /कला/ व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापिठे.

प्रत,

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, ( पापु-१६ ), मंत्रालय, मुंबई-३२.

**प्रवेश घेताना महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी त्यांना असणाऱ्या स्वच्छताविषयक सवयी तसेच त्यांच्या घरी असणाऱ्या स्वच्छता विषयक सुविधांची माहिती भरण्याचा नमुना.**

| | | |
|---|---|---|
| १ | नाव | |
| २ | कायम रहिवासाचा पत्ता | |
| ३ | कुटूंबाची माहिती | कुटूंबातील सदस्यांची संख्या -<br>शौचालय वापर करणाऱ्यांची संख्या- |
| ४ | शौचालयाची उपलब्धता | आहे ☐ नाही ☐<br>शौचालयाची उपलब्धता नसल्यास कारण - |
| ५ | हात धुण्याची सवय | जेवणापुर्वी - आहे ☐ नाही ☐<br>असल्यास - साबणाने ☐ पाण्याने ☐ इतर ☐<br>शौचानंतर - आहे ☐ नाही ☐<br>असल्यास - साबणाने ☐ पाण्याने ☐ इतर ☐ |
| ६ | वचननामा | शौचालयाची आवश्यकता व त्याचा सातत्याने वापर करण्याबाबतचे संस्थेने केलेले आवाहन मी वाचले व त्याबाबतचे महत्व मला मनापासून पटले आहे. मी याचे महत्व माझ्या घरातील सर्वांना समजावुन सांगुन येत्या तीन महिन्यात माझ्या घरी शौचालय बांधेन व सर्व जण त्याचा नियमित वापर करण्याचे वचन मी संस्थेस देत आहे. |

दिनांक :-

स्वाक्षरी -